Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

अंक १८वा | जुलै २०२२

## आमचे ध्येय

***गरिबीचे पिढ्यानपिढ्याचे चक्र खंडित करा, एका वेळी एक जीवन.***

गेल्या १५ वर्षाहून अधिक काळात ग्रामीण भारतातील ३,४४,८७४ पेक्षा जास्त व्यक्तींचे जीवन प्रभावित करण्यात आम्हाला यश मिळाले आहे. संस्थेच्या आनंदो व जागृती प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, समुदाय विकास, कौशल्य विकास, आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धन असे विविध उपक्रम राबवीत आहोत.

## विश्वस्त मंडळ

- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. मनोज मुरारका** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. ॲश्दीन डॉक्टर** – विश्वस्त

amazonsmile
You shop. Amazon gives.

अमेझोन तुमच्या पात्र अमेझोन स्माईल खरेदीच्या किंमतीपैकी ०.५ % तुमच्या पसंतीच्या धर्मादाय संस्थेला दान करते. **QR कोड स्कॅन करून** लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला सपोर्ट करा किंवा खालील लिंकला भेट द्या.
**http://smile.amazon.com/ch/20-5402443**

## मंथन २०२२





दि. २ व ३ जून २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्मचारी वर्गासाठी मंथन हा वार्षिक क्षमता बांधणी कार्यक्रम, कर्जत जवळील कुशिवली येथील युनिव्हर्सल बिझनेस स्कूलच्या संकुलात संपन्न झाला. या दोन दिवसीय कार्यक्रमासाठी संस्थेचे १५० कर्मचारी उपस्थित होते. युनिव्हर्सल बिझनेस स्कूलचे संस्थापक आणि अध्यक्ष श्री तरुणदीप सिंग आनंद आणि UBS व्यवस्थापन समिती यांनी त्यांचा सुंदर परिसर आणि सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. या कार्यक्रमासाठी श्रीमती विली डॉक्टर – संस्थापक-व्यवस्थापकीय विश्वस्त, श्री ॲश्दीन डॉक्टर – विश्वस्त, तसेच लाइट ऑफ लाइट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रमेश दासवानी उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण मोहीम




५ जून या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लाइट ऑफ लाईफ ट्रस्ट संस्थेने रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील तिवरे गावात १००० रोपांची लागवड केली. या वेळी 'प्लांट ए ट्री' या ऑनलाइन वृक्षारोपण मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. या अनोख्या मोहिमेमुळे देणगीदारांना वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे. देणगीदारांच्या पसंतीनुसार शोभेच्या झाडांची किंवा फळझाडांची लागवड केली जाईल. संस्थेच्या मुख्यालय टीम व जागृती टीम यांनी हा उद्घाटन सोहळा पार पाडला. या प्रसंगी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे श्री रमेश दासवानी – सी.ई.ओ. आणि श्रीमती कमल दमानिया – सी.ओ.ओ. उपस्थित होते. तिवरे, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जीवन आशा समुदाय केंद्रातही रोपांची लागवड करण्यात आली.

वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत रोपे दान करण्यास इच्छुक व्यक्तींनी खालील लिंकवर क्लिक करावे : https://rzp.io/l/PlantATree

## 'ब्राइट स्पॉट्स' या 'भारतीय एनजीओ फंडरेझिंग' – अहवाल २०२२ मध्ये लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा समावेश



१० भारतीय स्वयंसेवी संस्थांपैकी पहिल्या २ मधील एक **'ब्राइट स्पॉट'** स्वयंसेवी संस्था म्हणून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची निवड झाली. संहिता सोशल व्हेंचर्सच्या सहयोगाने बर्कले विद्यापीठाचे डायरेक्टर ऑफ फिलांथ्रोफी श्री मॉरी राव हर्मन यांनी 'इंडियन एनजीओ फंडरेझिंग' 'ब्राइट स्पॉट्स' संशोधन अहवाल – २०२२ मध्ये लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा उल्लेख केला आहे.

दि. ४ जून २०२२ रोजी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सदस्यांना एम.सी.ए. क्रिकेट क्लब, मुंबई येथे संस्थेने हाती घेतलेल्या कार्याबद्दल माहिती देण्यासाठी आमंत्रित केले गेले होते. यावेळी इतर अनेक स्वयंसेवी संस्था तसेच मान्यवर आमंत्रित वक्ते उपस्थित होते.





## स्टर्लिंग अँड विल्सन रिन्युएबल एनर्जी लिमिटेड यांच्या सहकार्याने आनंदो शाळा सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत (ASEP) शाळांमधील संगणक आणि विज्ञान प्रयोगशाळांचे उद्घाटन



दि. ३० जून २०२२ रोजी, स्टर्लिंग आणि विल्सन रिन्युएबल एनर्जी या भागीदार संस्थेच्या प्रतिनिधी श्रीमती झेनोबिया उनवाला व श्रीमती सुजाता राजगोपालन यांच्या उपस्थितीत ३ शाळांमध्ये विज्ञान व संगणक प्रयोगशाळांचे उद्घाटन करण्यात आले. याशिवाय शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रमही यावेळी घेण्यात आला.





## लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट मोबाईल मेडिकल युनिट टीम, कर्जत यांचा डॉ. जी.डी. पोळ फाउंडेशन, वाय.एम.टी. दंतवैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटल यांच्याकडून गौरव









लाईट ऑफ लाइफ ट्रस्ट व येरला मेडिकल ट्रस्ट दंतवैद्यक महाविद्यालय यांच्या सहयोगाने विविध आरोग्य शिबिरे व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून ग्रामीण समाजासाठी अमुल्य आरोग्य सेवा प्रदान केल्याबद्दल, संस्थेच्या कर्जत मोबाईल मेडिकल युनिट टीम यांना, दि. १७ जून २०२२ रोजी, डॉ. जी.डी. पोळ फाऊंडेशन, वाय.एम.टी. दंतवैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, खारघर, नवी मुंबई यांच्याकडून स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## युनिव्हर्सल बिझनेस स्कूल, कर्जत यांच्या 'SMART' या सामाजिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतल्या जाणाऱ्या सी.एस.आर. उपक्रमांसाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने सहयोग दिला आहे.



दि. ४ एप्रिल ते दि. ९ एप्रिल २०२२ या कालावधीत यु.बी.एस.च्या विविध विद्याशाखांमधील २५६ विद्यार्थ्यांच्या ६ गटांची नियुक्ती लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या शिक्षण, उपजीविका, आरोग्य आणि पर्यावरण या चार विभागांमध्ये करण्यात आली. या अंतर्गत यु.बी.एस.च्या विद्यार्थ्यांना विविध उपक्रम करण्याची संधी संस्थेने उपलब्ध करून दिली. दि. ९ एप्रिल रोजी झालेल्या सांगता समारंभासाठी श्री. रमेश दासवानी, सी.इ.ओ., लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, यू.बी.एस.चे संचालक प्रो.ब्रिगेडियर जीपीएस चीमा, यू.बी.एस.च्या संशोधन विभागाचे उपसंचालक प्रा. एम. गुरुप्रसाद, प्रा. मानिनी ढोले, सहाय्यक प्राध्यापक व ऑपरेशन्स आणि आयटी व ॲकॅडमिक प्रोग्राम, डॉ. प्रांजली मधुर, सहयोगी प्राध्यापक आणि एच.ओ.डी. तथा एच.आर., अकॅडमिक अफेअर्सचे संचालक तथा आंत्रप्रिनरशीप अँड इनक्यूबेशन सेंटरचे प्रमुख व एफ.पी.एम. यू.बी.एस.चे अध्यक्ष डॉ. करुणाकर झा हे मान्यवर व लाईट ऑफ लाईफ संस्थेचे सदस्य उपस्थित होते.



## दहावीचे यशवंत विद्यार्थी



1ST वर्षा रामदास पालवे



2ND सोनाली प्रकाश पवार



3RD सोनेराव बळीराम आतोळे

## बारावीचे यशवंत विद्यार्थी



1ST साहिल बी. बोराडे



2ND भारती गणेश चौधरी



3RD राजेश्री विलास पवार

## सोशल मीडिया आकडेवारी
(८ जुलै २०२२ पर्यंत)

- YouTube: ७७.३ हजार व्ह्यूज, वॉच टाईम २.४ हजार तास, २६३० सबस्क्रायबर्स.
- Twitter: ३२३
- Instagram: २४४३
- Facebook: ८७१३
- LinkedIn: १८५०

## लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या मराठी वार्तापत्राचे प्रकाशन

लाईट ऑफ लाईफ संस्था अत्यंत आनंदाने जाहीर करत आहे की दि. १६ जून २०२२ रोजी कर्जत केंद्र भेटीदरम्यान पाहुण्यांच्या उपस्थितीत संस्थेच्या वार्तापत्राच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रमेश दासवानी आणि संस्थेच्या शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रमुख श्री. सुधीरकुमार गजभिये यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ. विवेक मेंडोन्सा, ग्रुप डायरेक्टर - मार्केटिंग, LYNX- लॉरेन्स अँड मेयो, श्रीमती सुहानी मेंडोन्सा, कॅप्टन अहलुवालिया आणि मराठी सिनेअभिनेत्री श्रीमती मनीषा केळकर यांची उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमासाठी आनंदो प्रकल्पाचे सदस्य उपस्थित होते.



लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट बिल डेस्कवर आहे. तसेच ४७ बँकांच्या बिल पे टॅबवरही आहे.

DBS | DCB BANK | HDFC BANK | IndusInd Bank | kotak | standard chartered | YES BANK

## आमच्या विद्यार्थ्यांची अभिमानास्पद कामगिरी!



कु. हर्षला दिघे संस्थेच्या आनंदो प्रकल्पातील डॉक्टर झालेली पहिली लाभार्थी कु. हर्षला दिघे हिने रायगडजिल्ह्यातील कर्जत तालुक्यात कशेळे गावात 'माऊली कृपा' या नावाने स्वतःच्या क्लिनिकची सुरुवात केली आहे. लाईट ऑफ लाईफ संस्था तिला भावी आयुष्यासाठी सुयश चिंतीत आहे.

## आमचे गौरवशाली विद्यार्थी!



नंदुरबार जिल्ह्यातील आनंदो प्लस लाभार्थी श्री. राहुल लांबोडे व श्री. प्रदीप समुद्रे यांनी नंदुरबार जिल्ह्यातील प्रकाशा गावात स्वत:चे सॉफ्ट ड्रिंक बनविण्याचे युनिट सुरू केले आहे. श्री. राहुल आणि श्री. प्रदीप या दोघांचीही आर्थिक परिस्थिती नाजूक असून त्यांनी अत्यंत मेहनतीने स्वत:चे शिक्षण पूर्ण केले आहे. लाईट ऑफ लाईफ संस्थेचे भक्कम पाठबळ मिळाल्याने त्यांना शिक्षण पूर्ण करून स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याचा आत्मविश्वास प्राप्त झाला.

राहुल आणि संदीप यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी संस्थेच्या शुभेच्छा त्यांच्या सतत पाठीशी असतील.

## आमचे गौरवशाली विद्यार्थी!



श्री शिवदाश पाडवी नंदुरबार जिल्ह्यातील शेलवई केंद्रातील आनंदो प्लस लाभार्थी श्री. शिवदाश पाडवी यांना महाराष्ट्र मनुष्यबळ विकास संस्था यांच्यातर्फे राज्यस्तरीय 'युथ आयकॉन इन स्पोर्ट्स' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. श्री. शिवदाश पाडवी राज्यभर विविध योग स्पर्धांमध्ये सहभागी होत असून स्पर्धा जिंकत आहेत.

## आमचे गौरवशाली विद्यार्थी !



कु प्रणाली बडेकर लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या कर्जत केंद्रातील आनंदो प्लस विद्यार्थिनी कु. प्रणाली बडेकर हिने कर्जत येथे 'चष्माघर' नावाने स्वत:चे चष्म्याचे दुकान सुरू केले आहेत. संस्थेने आर्थिक पाठबळ पुरविल्यामुळे प्रणालीला ऑप्टोमेट्रीमध्ये पदवी मिळविता आली. तिने एच. व्ही. देसाई रुग्णालय, पुणे येथे ३ वर्षे काम करण्याचा अनुभव घेतला आहे.

## आमचे गौरवशाली विद्यार्थी!



कु. वैभव तुकाराम मोरे मुंबई येथील महाराष्ट्र सुरक्षा बल (एम.एस.एफ.) येथे कोंदीवडे केंद्रातील (कर्जत, जिल्हा रायगड) कु. वैभव तुकाराम मोरे यांची निवड झाली आहे. बारावी नंतर वैभवला एम.एस.एफ. मध्ये प्रवेश घ्यायचा होता, म्हणून त्याने प्रवेश परीक्षेची तयारी केली. आपल्या जिद्दीने आणि मेहनतीने, तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे तो फिजिकल (मैदानी) आणि लेखी परीक्षेत यशस्वी झाला. अशा प्रकारे वैभवची निवड एम.एस.एफ. मुंबई विभागात झाली.

## आमचे गौरवशाली विद्यार्थी!



श्री सुमेध आवारे लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, जालना येथील आनंदो प्लस लाभार्थी श्री. सुमेध आवारे वकील झाले आहेत. बी.एल.एस./एल.एल.बी. पूर्ण करणारे ते संस्थेतील पहिले लाभार्थी आहेत. सध्या ते जे.एम.एफ.सी. आणि सी.जे.आय.डी. कोर्ट, तालुका मंठा, जिल्हा जालना येथे वकिलीची प्रॅक्टिस करीत आहेत. आवारे कुटुंबियांना आणि लाईट ऑफ लाईफ संस्थेला सुमेधच्या कर्तृत्वाचा अभिमान आहे. सुमेधच्या उज्वल भविष्यासाठी त्याला आमच्यातर्फे अनेक शुभेच्छा.




**Sunhere Alfaaz II**

**Celebrating the lyrics of Golden Era**

**14th October 2022 at the Nehru Centre Auditorium, Worli, Mumbai.**

## डॉ. रेणुका अशोक ढवळे यांचे अभिनंदन!




जालना जिल्ह्यातील आनंदो प्लस लाभार्थी कु. रेणुका अशोक ढवळे बी.ए.एम.एस. (बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसीन अँड सर्जरी) यशस्वीरीत्या उत्तीर्ण होऊन डॉक्टर झाल्या आहेत. पुण्याच्या आयुर्वेदिक आणि संशोधन महाविद्यालयात रेणुकाने ५ वा क्रमांक पटकावला आहे.

## आमचे गौरवशाली विद्यार्थी!



कु. विद्या ठाकूर इंग्रजी शिक्षिका म्हणून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वरळी केंद्रातून कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या वरळी केंद्रातील आनंदो प्लस लाभार्थी श्रीमती विद्या ठाकूर आता लाला लजपतराय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, मुंबई येथे कम्युनिकेशन फॅकल्टी म्हणून कार्यरत आहे. संस्थेसाठी ही बाब अत्यंत अभिमानाची आहे. नोकरी सांभाळून विद्या बी.एड.चे शिक्षण देखील घेत आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वतीने तिला भविष्यातील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा.

## आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद – टाटा केमिकल अँड फोकस यू एंगेज इंडिया प्रशिक्षण संस्था



लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, अलिबाग येथील बोर्ली, वाळके, रामराज आणि बेलोशी केंद्रांमधील लाभार्थ्यांना, टाटा केमिकल्स आणि फोकस यू एंगेज इंडिया प्रशिक्षण संस्थेतर्फे ६ सायकलींचे वाटप करण्यात आले. या देणगीबद्दल लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट त्यांची अत्यंत आभारी आहे. चोंढी, अलिबाग येथे असलेल्या फाऊंटन हेड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये दि. १८ जून २०२२ या दिवशी हा कार्यक्रम झाला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल टाटा केमिकल अँड फोकस यू एंगेज इंडिया प्रशिक्षण संस्था यांनी अभिप्राय नोंदविला. त्याचप्रमाणे त्यांनी लाभार्थ्यांशीसुद्धा संवाद साधला.



## आमचे गौरवशाली विद्यार्थी!



श्री विनीत पाटील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या अलिबाग विभागातील साळाव केंद्रातील आनंदो प्लस विद्यार्थी श्री. विनित पाटील याने दापोली, जिल्हा रत्नागिरी येथील श्री रामराजे महाविद्यालयातून हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटमध्ये विज्ञान शाखेतील पदवी प्राप्त केली आहे. आता तो अबूधाबीच्या मुंबई चॅट या रेस्टॉरंटमध्ये काम करत आहे. वंचित ग्रामीण पार्श्वभूमी असूनही परिश्रमपूर्वक काम केले तर एखादी व्यक्ती आपली स्वप्ने साकार करू शकते याचे एक उत्तम उदाहरण विनीतने मित्र–मैत्रिणींसमोर ठेवले आहे.

## शैक्षणिक साहित्य वाटप.




२०२२ या नवीन शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ, आनंदो व आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून झाला. शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास सुरु राहातो, तसेच यामुळे शाळाबाह्य मुलांचे प्रमाण नियंत्रित रहाते.

## जागतिक आरोग्य दिन संपन्न.



दि. ७ जून २०२२ रोजी संस्थेच्या कर्जत विभागातील मेडिकल मोबाईल युनिटतर्फे जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी कर्जत तालुक्यातील कशेळे येथे रोजगार प्रशिक्षण केंद्राच्या शिवणकाम वर्गाच्या लाभार्थ्यांच्या नवीन तुकडीसाठी कोविड लसीकरणाबाबत जाणीवजागृती सत्र घेण्यात आले.

## श्री मॉरी राव हर्मन एम.पी.ए. डायरेक्टर ऑफ फिलांथ्रोफी, कॅलिफोर्निया विद्यापीठ बर्कले यांची संस्थेस भेट



दि. १ एप्रिल २०२२ रोजी, कॅलिफोर्निया बर्कले विद्यापीठाचे डायरेक्टर ऑफ फिलांथ्रोफी एम.पी.ए. श्री मॉरी राव हर्मन यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जीवन आशा कम्युनिटी सेंटर, तिवरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील आनंदो प्रकल्पाच्या कार्यालयाला भेट दिली.

श्री. मॉरी राव हर्मन यांनी त्यांच्या संशोधनाचा भाग असलेल्या 'ब्राइट स्पॉट' स्वयंसेवी संस्थांच्या सर्वेक्षणाच्या संदर्भात या भेटीचे आयोजन केले होते.



## पेंग्विन प्रकाशनाच्या श्रीमती शुभ्रा यांची, तिवरे येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या जीवन आशा कम्युनिटी सेंटरला भेट.

दि. ७ जून २०२२ रोजी, पेंग्विन प्रकाशनाच्या श्रीमती शुभ्रा यांनी, श्रीमती कमल दमानिया, सी.ओ.ओ., लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांच्यासह तिवरे येथील जीवन आशा कम्युनिटी सेंटर तसेच कर्जतच्या आनंदो प्रकल्प कार्यालयाला भेट दिली. प्रकल्पांतर्गत सुरू असलेले विविध उपक्रम समजून घेणे आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधणे असा या भेटीचा हेतू होता. पाहुण्यांनी या वेळी संस्थेच्या लाभार्थ्यांच्या गृहभेटी केल्या आणि लाभार्थी व पालक यांच्यासोबत संवाद साधला.





## कर्जतच्या लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला विशेष मान्यवरांची भेट.









दि.१६ जून २०२२ रोजी लाइट ऑफ लाईफ ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रमेश दासवानी, मराठी सिनेअभिनेत्री श्रीमती मनीषा केळकर, डॉ. विवेक मेंडोन्सा, ग्रुप डायरेक्टर – मार्केटिंग, LYNX लॉरेन्स अँड मेयो, श्रीमती सुहानी मेंडोन्सा आणि कॅप्टन अहलुवालिया यांनी संस्थेच्या कर्जतमधील केंद्रांना भेट दिली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या 'प्लांट ए ट्री' मोहिमेच्या युथ अँबेसेडर मनीषा केळकर यांनी इतर मान्यवरांसह वृक्षारोपण उपक्रमात सहभाग घेतला. त्यानंतर कॅप्टन अहलुवालिया यांनी आनंदो प्लस लाभार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सत्रात करिअर मार्गदर्शन केले.

आनंदो प्लसच्या कर्जत येथील लाभार्थी श्रीमती शुभांगी मोरे यांनी सुरू केलेल्या 'एकदंत' या चष्म्याच्या दुकानालाही मान्यवरांनी भेट दिली.

## संपर्क

**मुख्य कार्यालय**
वन बीकेसी, सी–विंग, युनिट क्रमांक: १५१९, प्लॉट नं.: सी–६६,
जी–ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पु),
मुंबई – ४०० ०५१. दूरध्वनी: +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल: connect@lightoflifetrust.org

**शाखा कार्यालये:**
**महाराष्ट्र :** अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ
**मध्य प्रदेश :** सिवनी **राजस्थान :** बिजोलिया
**ओडिशा :** अंगुल

www.lightoflifetrust.org +91-9820229445

@LightOfLifeTrustIndia @lightoflifetrust_lolt @lightoflifetrst lightoflifetrust youtube.com/c/lightoflifetrust

## पुढील नियोजित कार्यक्रम

**'सुनहरे अल्फाज भाग दोन–** वरळी मुंबई येथील नेहरू सेंटर सभागृहात, दि. १४ ऑक्टोबर २०२२ रोजी मजरूह सुलतानपुरी, शैलेंद्र आणि राजा मेहंदी अली खान यांच्या गीतांचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

**दि. १४ ऑक्टोबर २०२२ रोजी वरळी मुंबई येथील नेहरू सेंटर सभागृहात 'सुनहरे अल्फाज भाग दोन – लिरिक्स ऑफ द गोल्डन एरा'** या निधी संकलन कार्यक्रमाची उद्घोषणा लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट करत आहे.

भारतीय सिनेमातील उत्तमोत्तम आणि अविस्मरणीय गीतकारांच्या स्मरणार्थ लाईट ऑफ लाईफ संस्थेने २०१९ सालापासून सुनहरे अल्फाज ही सांगीतिक संकल्पना साकारण्यास सुरुवात केली आहे. साहीर लुधियानवी, जान निसार अख्तर, कैफी आझमी आणि गुलझार या चार महान गीतकारांची गीते आम्ही सन २०१९ मध्ये सादर केलेली आहेत. हीच संकल्पना पुढे नेत, २०२२ मध्येही (कोविड काळातील प्रदीर्घ अंतरानंतर) गीतकार मजरूह सुलतानपुरी, शैलेंद्र आणि राजा मेहंदी अली खान यांच्या काव्यप्रतिभेला श्रद्धांजली म्हणून कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या महान गीतकारांच्या गीतांनी पुढील अनेक पिढ्यांचे संगीत विश्व समृद्ध केले आहे.

गायिका श्रीमती संजीवनी भेलांडे, गायक वैभव वशिष्ठ, शिरीष कांबळे या कार्यक्रमासाठी गीतगायन करणार असून, २४ वादकांच्या ऍकॉस्टिक वाद्यवृंदासमवेत हा कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमातून मिळणारा सर्व निधी देणगी स्वरूपात दिला जाणार आहे.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला पेटीएमवरून देणगी देण्यासाठी
लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला ऑनलाइन देणगी देण्यासाठी
Contribute Now ! Paytm
https://m.paytm.me/LOLT